# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २७/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** – अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मौजा वारेगाव शिवार येथे दिनांक २५/०९/२२ चे २०.०० वा. ते दिनांक २६/०९/२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश हेमराज खडसे, वय ३० वर्ष, रा. वारेगाव वार्ड नं २, मौजा वारेगाव यांचे वारेगाव शिवारातील श्रीराम पानठेला नावाची दुकान असून दक्षिण भिंतीला असलेल्या लोखंडी दरवाजाच्या पत्रा अज्ञात आरोपीने खालुन वाकुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फ्रिज, खर्रा मशिन, गॅस शेगडी, ईतर किरकोळ सामान व नगदी ३००/–रू. असा एकुण कि. १९,७००/–रु. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक रेवतकर मो.नं. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** – अंतर्गत वार्ड नं ०२ चांदणी चौक सिल्लेवाडा येथे दिनांक ०५/०९/२२ चे १०.०० वा. ते दिनांक २२/०९/२२ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा पार्वताबाई मुलचंद तांडेकर वय ६२ वर्ष, रा. वार्ड नं. ०२ चांदणी चौक, सिल्लेवाडा ही तिची मुलगी हिचे घरी नागपुर येथे गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे छतावर चढुन सिमेंट सिट तोडुन घराच्या आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने हॉलमध्ये असलेली सोनी कंपनीची ३२ इंच टीव्ही किंमती १०,०००/–रू., किचन मधिल ठेवलेले दोन एच पी कंपनीचे सिलेंडर किंमती २,०००/–रू. व एक पितळी गुंड किंमती ३,००/–रू. व तेलाचा भरलेला पिपा किंमती २,०००/–रू. असा एकुण कि. १४,३००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान मों नं ८२०८५११६६३ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर** – अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील हेटी सुर्ला सावनेर येथे दिनांक २०/०९/२२ चे २२.०० वा. ते दिनांक २५/०९/२२ चे ०८.०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने मौजा हेटी सुर्ला शिवारातील महाजन पेट्रोलपंप्च्या मागच्या डिपी वरील १२ गाडे, ३ फेज, ४ वायर मौजा सोनोली रोवर शिव मंदीराच्या मागच्या बाजुनी उच्च दाब वाहीनी चे १२ गाडे ३ फेज ४ वायर, दि २५.०९.२२ रोजी मौजा तेलकामठी येथील ७ गाडे ३ फेज ४ वायर महावितरण कंपनी चे ५ कि. मी. लांब ॲम्युमिनयम विद्युत तार अंदाजे किंमत ६२,०००/–रु. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कु. दिपीका रामदासजी चव्हान कनिष्ठ अभियंता महावितरण तेलकामठी कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला

आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश नांदुरकर मो.क्र. ८६०५३८१५९० हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. काटोल :–** दिनांक ०१/०५/२०२१ चे ००:०० वा. ते दिनांक ०६/०५/२०२२ चे ००.०० वा. चे सुमारास वय २७ वर्ष फिर्यादी/पीडिता हिला आरोपी नामे– क्र. १) अय्युब अब्दुल्ला शेख वय ३१ वर्ष, रा. हत्तीखाना काटोल याने पीडिता हिला लग्नाचे आमिष दाखवुन मैत्री केली. तसेच आरोपी क्र. १ ने तिच्या संमतीशिवाय वारंवार तिच्या सोबत शारीरिक संबंध केला. तसेच आरोपीचा जिजा आरोपी क्र. २) मोहम्मद सादिक शेख, वय ५२ वर्ष, रा. कोंढाळी याने पीडितेस दि.०६/०५/२०२२ रोजी जातीवाचक शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(१),३७६(२)(जे),५०४, ५०६,३४ भादंवि. सहकलम ३(१) आर एस डब्लु ३(२)(व्हि) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री नागेश जाधव हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा भिलेवाडा शिवार येथे दिनांक २४/०९/२२ चे १४. ०० वा. ते १५.०० वा. सुमारास आरोपी नामे– शुभम शुकर ठाकरे(मृतक), वय २४ वर्ष, रा. हिवरा हिवरी हा त्याचे मामाचे नावाने असलेली एम–४०/एई–१९६२ क्रमांकाच्या प्लेझर दुचाकी वाहनाने एकटाच स्वता चालवित हिवराहिवरी वरून मामाचे गावी पिपरीया कडेजात होता. त्यादरम्यान भिलेवाडा शिवारात अचानक त्याची मोटारसायकल रोडवरस्लिप झालेने तो राडेवर पडला. या अपघातात त्याचे डोक्याला मार लागुन उपचारदरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावला. सदर मृतक हा त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्वताचे मरनास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरज शंकर ठाकरे, वय २८ वर्ष, रा. हिवरा हिवरी रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी भुते मो.नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## निष्काळजीपणामुळे मृत्यु

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील ए.ई.सि. प्लास्टिक लिमीटेड कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक २४/०९/२२ चे १४.०० वा. ते १५.०० वा. सुमारास आरोपी क्रं ०१. अरून विक्रम वायकेन, वय १८ वर्ष, रा. टेंभरी हा कंपनीमध्ये कामावर हजर असतानां डि बेलर मशिनचे आतमध्ये कोणी आहे किंवा नाही हे न पाहता मशिन सुरू केली असता मशिनमध्ये काहितरी अडकल्याचा आवाज आल्याने मशिन बंद केली. मशिनमध्ये दिपक नानकेश भिल(मृतक), वय १८ वर्ष, रा. टेंभरी हा गंभीररित्या जख्मी होवुन मशिनमध्ये फसल्याचा दिसुन आल्याने त्याने कंपनीमधिल इतर लेबर यांना आवाज देवुन त्यांचे मदतिने त्यास बाहेर काढले. तो जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी प्रथम रचणा हॉस्पीटल व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले. सदर मर्गचे कागदपत्र पोस्टे एमआयडीसी बोरी ला टपाली प्राप्त झाल्याने पोस्टेला मर्ग क्रं ३०/२२ कलम १७४ जा.फौ अन्वये नोंद केले. सदर मशिनमध्ये कोणी आहे याची खात्री न करता मशिन सुरू केल्याने मृतक हा मशिनची साफसफाई करीत असतानां मशिनमध्ये अडकुन गंभिररित्या जखमी

होवुन मरण पावला. तसेच आरोपी क्रं २) बलराज नारायन इंगळे रा. वेद आर्या सिटी बुटीबोरी व ३) बबलुकुमार धनिराम चौरसिया रा. टेंभरी ता.हिंगणा

यांची सेफ्टी ऑफिसर व मॅनेजर व कंपनीमध्ये देखरेख कारीता डयुटी असता तेथे हजर राहीले नाही. वरील आरोपी क्रं ०१,०२,०३ यांचे निष्काळजीपणामुळे व हयगयपणमुळे मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याचे मर्ग चौकशीमध्ये निष्पन्न झाल्याने सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा इकबाल शेख पोस्टे एमआयडीसी बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी रामेश्वर राय मो क्रं. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. अरोली :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा बारशी येथे दिनांक ०९/०९/२०२२ चे १७.०० वा. दरम्यान **शंकर चंद्रभान घरजाळे (मृतक), वय 80 वर्ष रा. बारशो दुधाळा ता. मौदा जि. नागपुर** हे आपले घरो अंगणात हजर असता बकऱ्याने धडक मारल्याने मार लागून उपाचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी सरतर्फे मपोहवा मिनाक्षी गेडाम पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक विशाल महालकर मो.क्र. ९९२२९९६५८८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील भायवाडी शिवार येथे दिनांक १९/०९/२०२२ चे १५.०० वा. चे १६.०० वा. दरम्यान **अमित राजकुमार डवरे (मृतक), वय २६ वर्ष, रा. नरखेड** हा एमएच— ४०/ बीक्यु— ३८६५ क्रमांकाच्या मोटरसायकल ने माणिकवाडा वरून नरखेड येथे जात असता भायवाडी गावाजवळ अपघात झाला. या अपघातात त्याचे डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यास उपचाराकरिता प्रथम ग्रामिण रूग्णालय नरखेड व नंतर मेडिकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मेडिकल पोलीस बुथ नागपूर येथुन दिनांक २६/०९/२०२२ रोजी मर्ग डायरी प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विराज चित्रकुमार डवरे, वय २१ वर्ष, रा. माणीकवाडा, नरखेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक निलेश खरडे मो.क्र. ९३२५२०३६४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर